बुधवार, दि २ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे जालन्यात संपर्क कार्यालय सुरु करावे

### मराठा महासंघाचे अरविंद देशमुख यांचे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचे अधिकृत संपर्क कार्यालय स्थापन करण्यात यावे आणि त्यांनी पंधरा दिवसांतून एकदा या कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशी मागणी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी केली आहे.

अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखालील मराठा महासंघाच्या शिष्टमंडळाने मंगळवार दि. १ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय व अन्य प्रशासकीय कार्यालयांना भेट द्यावी लागते. त्यामुळे त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि शासन-प्रशासन यांचा समन्वय वाढवण्यासाठी पालकमंत्र्यांचे संपर्क कार्यालय स्थापन होणे आवश्यक आहे. पालकमंत्र्यांचे निश्चित संपर्क कार्यालय नसल्याने नागरिकांना थेट संवाद साधण्यास अडचणी येतात. त्यामुळे हे कार्यालय



स्थापन झाल्यास प्रशासन अधिक पारदर्शक होईल आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी गतिमान होईल. पालकमंत्र्यांनी पंधरा दिवसांतून एकदा कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्यात व त्यावर उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी असेही देशमुख यांनी केली आहे. या निवेदनावर जिल्हा सरचिटणीस संतोष कऱ्हाळे, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवा जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष इंजि. शुभम टेकाळे, कामगार आघाडीचे मंगेश मोरे, जिल्हा संघटक अजय कोल्हे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

युवा आदर्श

### जोकर ...

सर्कसमध्ये जोकर
जागो जागी पडतो
माहिती असून मुर्ख
रे पुन्हा पुन्हा चढतो
मजा पाहे मोठे पण
जोकर कसा रडतो
खळाळ हसवे सर्वां
कलाकार तो घडतो
प्रेक्षकांचा तया वरी
जीव किती जडतो
दुभंगलेल्या मनाला
तो हळूवार जोडतो
मुखस्तंभ माणसाही
हास्य सागरा ओढतो
हवाहवा वाटे जोकर
लावी अशी ओढ तो
मुर्ख भले म्हणे कुणी
तोच शहाणा असतो
त्यांच्यामुळे रडणारा
रे खळखळून हसतो
जिथे तिथे आम्हांला
रे शहाणपणा नडतो
मना दडलेला जोकर
धाय मोकलून रडतो
जाणून बुजून नक्की
मी एप्रिल फूल फसतो
समोरच्या द्या आनंद
तो खळखळून हसतो

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## लिंबे वडगांव पुर्नवसनमध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा

**परतूर । प्रतिनिधी -** उपविभागीय कार्यालय परतूर येथे दि.०१/०४/२०२५रोजी लिंबे वडगांव येथील समस्त गावकरी यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. भूसंपादन जिल्हा जालना मौजे पाटोदा साठवण तलावा अंतर्गत मौजे लिंबे वडगाव तालुका मंठा येथील गावठाणातील घरे बुडीत क्षेत्र करिता संपादित होत असल्यामुळे सदरील संपादित प्रक्रियेमध्ये असलेल्या त्रुटी पूर्ण करून अंतिम यादी प्रत्यक्ष जाय मोक्यावर जाऊन पंचनामा करूनच अंतिम यादी तयार करण्यात यावी.जा.क्र.२०२५/भूसंपादन सी आर ३४५ कार्यालय उपविभागीय अधिकारी. लिंबे वडगाव येथील रहिवाशी असून मुक्त संदर्भान्वये आम्हाला आपल्या कार्यालयाकडून नोटीस प्राप्त झालेली नाही वास्तविक पाहता सदरील यादी आपल्या कार्यालयाकडून आम्हाला दाखवणे आवश्यक होते परंतु तसे झाले नाही किंवा तलाठी ग्रामसेवक यांच्या मार्फत देखील नोटीस ची सूचना देण्यात आलेली नाही आमच्या नावाने मौजे लिंबे वडगाव येथील घरे सहान जागा हे पाटोदा साठवण तलावा करिता संपादित होत आहे व त्याकरिता आपल्या कार्यालयाकडून अनेक दिवसापासून प्रक्रिया चालू आहे त्यातच एक भाग म्हणून मुक्त संदर्भाने नोटीस काढली आहे सदरील संपादन प्रक्रिये बाबत संदर्भान्वये प्राप्त यादीमध्ये अर्जदाराचे मालकीचे क्षेत्र कमी अधिक नमूद करण्यात आले आहे. यादीमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत प्रत्यक्ष संपादित क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र नमूद करण्यात आले नावामध्ये चुकी आढळून आल्या सौचालय संपादित दाखविले नाही बांधकामाचे क्षेत्र दर्शविले नाही प्रत्यक्ष नमुना नंबर८ ऐवजी दुसरेच नाव आले आहे प्राप्त यादी मध्ये जे काही नागरिक राजकीय शहरीवंत अधिकाऱ्यांच्या जवळीक असणारे त्यांच्या घराचे मूल्यांकन इतर नागरिकांच्या घरापेक्षा दहा पट जास्तीचे दाखविण्यात आले आहे या प्रक्रियेमध्ये भूमी अभिलेख कार्यालय




पाटबंधारे विभाग जालना ग्रामपंचायत लिंबे वडगाव या कार्यालयाचा प्रामुख्याने समावेश आहे या कार्यालयातील कर्मचारी अधिकाऱ्यांनी आर्थिक व्यवहार करून मोठ्या प्रमाणात बोगस शेत्रफळांची नोंद केली त्यामुळे लाभार्थ्यांवर अन्याय झाला आहे. लिंबे वडगाव येथील झोपडपट्टी संपादित यादीत दिसून येत आहे ज्यामध्ये मोजणी करून मूल्यांकन देखील करण्यात आले. झोपडपट्टीची संपादन प्रक्रियेतून वगळण्यात आले ज्यामध्ये कार्यकारी अभियंता यांनी सदरील प्रक्रिये करणाऱ्या लिपिक, रोहित सोळंके यांच्या माध्यमातून काही प्रमाण प्रमाणात **पान ३ वर**

## १३ वर्षीय मुलाने महिलेला संपविले

### मोबाईल पाण्यात टाकून खराब केल्याच्या रागातून डोक्यात दगड घातला; पोलीस तपासात उघड

**जालना । प्रतिनिधी -** मोबाईल पाण्यात टाकून खराब केल्याच्या रागातून सातवीतल्या मुलाने चक्क डोक्यात दगड घालून गावातील महिलेची हत्या केल्याची धक्कादायक घटना जालन्यातून उघडकीस आली आहे. घनसावंगी तालुक्यातल्या अंतरवाली टेंभी गावात ही घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण मराठवाडा हादरला असून शेतात शेजारी राहणाऱ्या महिलेने फोन लावण्यासाठी या मुलाचा मोबाईल घेतला होता .मात्र तो पाण्यात पाडून खराब केल्याचा रागातून १३ वर्षाच्या मुलाने गावातील महिलेला संपवल्याची घटना घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

शेताजवळ शेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलानेच हे कृत्य केल्याचे जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात उघड झाले आहे .याप्रकरणी अल्पवयीन मुलाने खुनाची कबुली दिली असून त्याला बाल सुधार गृहात पाठवण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले .

२५ मार्च रोजी घनसावंगी तालुक्यातील टेंभी अंतरवली गावामध्ये मिराबाई बोंढारे या ४१ वर्षीय महिलेच्या कुणाची घटना उघडकीस आली होती .आरोपीचा मागवा काढण्याचा बराच प्रयत्न पोलिसांकडून होत होता .परिस्थितीजन्य पुराव्यांचा आधारे पोलिसांनी गावात चौकशी केली . या महिलेच्या शेताजवळ राहणाऱ्या तेरा वर्षीय मुलाची चौकशी केली असता या मुलानेच खूनाची कबुली दिल्याचे समोर आले आहे . याप्रकरणी या मुलाला बाल सुधारगृहात पाठवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे .

जालन्यातील घनसावंगी तालुक्यातील अंतरवली टेंभी गावात राहणाऱ्या एका महिलेने फोन लावण्यासाठी शेताजवळ शेजारी राहणाऱ्या १३ वर्षाच्या मुलाकडून मोबाईल घेतला. पण मुलाचा फोन पाण्यात पडून खराब झाला. महिलेने मोबाईल पाण्यात पाडून खराब केल्याच्या रागातून सातवीतल्या या अल्पवयीन मुलाने रागाच्या भरात महिलेच्या डोक्यात दगड घालून महिलेला ठार केल्याची घटना घडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शेतात काही दिवसांपूर्वी महिलेचा खून झाल्याची घटना **पान ३ वर**

## लाच घेतांना तहसिलदार एसीबीच्या जाळ्यात

**चंद्रपूर -** राज्यात गेल्या काही दिवसांत लाच लुचपतप्रतिबंधक विभागाने कारवाईचा धडाका लावला असून अनेक छोटे-मोठे अधिकारी जाळ्यात अडकले आहेत. काही दिवसांपूर्वी परभणीच्या महिला क्रीडा अधिकाऱ्यांस लाच घेताना एसीबीकडून रंगेहाथ अटक करण्यात आली होती. त्यानंतर, आता चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लापूरचे तहसीलदार लाच घेताना जाळ्यात अडकले आहेत. एसीबीने तहसलीदार गायकवाड यांना अटक केली असून यातील दुसरा आरोपी असलेला तलाठी फरार आहे. सध्या, एसीबीकडून आरोपी तलाठीचा शोध घेण्यात येत आहे.

बल्लारपूरचे तहसीलदार आणि त्यांचा सहकारी तलाठी असे दोघेही लाच प्रकरणात अडकले आहेत. फिर्यादीने स्वतःच्या शेतातील माती आणि मुरूमाचे उत्खनन केले होते. मात्र, हे उत्खनन अनधिकृत असल्याचे सांगत संबंधित महसूल कर्मचाऱ्यांनी त्याच्याकडे पैशांची मागणी केली. अनधिकृत गौण खनिज उत्खननाचे हे प्रकरण असून मिटविण्यासाठी लाच मागितली होती. संबंधित महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याकडे २ लाख २० हजार रुपयांच्या रक्कमेची मागणी केली होती. लाच **पान ३ वर**

## संपादकीय

# नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीचे वारे

नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्ष राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले. जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच ध्वस्त झाली. २००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते. माओवादी आणि लोकशाही वाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट यलगार पुकारला त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के पी ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचारामुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारी मध्ये एक निवेदन जरी केले या निवेदनात त्यांनी म्हटले की राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले. राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनामुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# राजकीय पुढाऱ्यांनो आपली पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैर वापर करू नका

ही बाब सत्य आहे की औरंगजेब क्रुर होता. कारण त्यांनी आपल्या बादशाहीसाठी आपला संपूर्ण परिवार संपविला आणि छत्रपती संभाजी महाराजांची अमानुषपणे यातना देऊन हत्या केली हेही सत्य आहे.आकाश-पाताळ एक केले तरी संभाजी महाराज कोणाच्याही हाती लागणारा योध्दा नव्हता. कारण तो छावा होता.आपल्याच माणसांनी फितूरी करून संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या ताब्यात दिले व मोठा घात झाला.यदाकदाचित असे जर झाले नसते तर छत्रपती संभाजी महाराजांनी संपूर्ण मोगलशाही क्षणातच संपुष्टात आणली असती हेही तितकेच सत्य आहे. परंतु फितूरीने संभाजी महाराजांचा घात झाला व औरंगजेबाने त्यांना कैद केले व अनंत यातना देऊन त्यांची हत्या केली.याचे दुःख आजही महाराष्ट्रासह संपूर्ण भारतवासीयांना होते व आहे.त्याचप्रमाणे आजही या घटनेने संपूर्ण जनतेचा खुन खवळतो.परंतु राजकीय पुढाऱ्यांचा नाही कारण ते स्वार्थापोटी वेगवेगळे नवीन-नवीन मुद्दे निर्माण करून धर्मा-धर्मामध्ये व्देष पसरविण्याचे काम करतात हा त्यांचा धंदा होऊन बसला आहे. भारतात इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.या दिडशे वर्षांत इंग्रजांनी लाखोंच्या संख्येने निरअपराधांचा बळी घेतला. गुन्हा नसतांनाही अनेकांना मृत्यूच्या खाईत लोटले.अशा भयावह परिस्थितीला सुध्दा राजकीय पुढाऱ्यांनी विसरून चालणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे. १३ एप्रिल १९१९ रोजी अनेक कुटुंबे जालियनवाला बागेत शांतता निषेधासाठी जमली होती. मात्र ब्रिटिश सैन्याच्या नेतृत्वाखालील जनरल डायरने आपल्या सैनिकांना गोळीबार करण्याचा आदेश दिला आणि पूर्ण दारूगोळा संपेपर्यंत हा नरसंहार सुरूच राहिला.या घटनेत १५०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले,तर १२०० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते.या घटनेने देशात सर्वत्र शोककळा पसरली व अंधक्कार निर्माण झाला.मग आपण आता इंग्रजांनी बांधलेल्या इमारती किंवा स्मारके तोडणार का? असाही प्रश्न उपस्थित होतो! त्यामुळे इतिहास घडला तो घडला त्यांच्याशी छेडछाड किंवा गैरवापर करून काहीतरी विवादास्पद वक्तव्य देवून आपसात झगडे लावण्याला काहीही अर्थ नाही असे मला वाटते.औरंगजेबाने भारतावर ४९ वर्षे (१६५८-१७०७)राज्य केले.याच्या तुलनेत इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.क्रूरता दोघांमध्येही होती या दोघांनी आपल्या संपूर्ण हद्दी पार करून भारतावर राज्य केले.त्यामुळे हा इतिहास आहे याला जर राजकीय पुढारी आपापल्या पद्धतीने हाताळीत असेल तर देशात व्दिधा निर्माण होवून आपसात किंवा धर्मा-धर्मात वैरत्व वाढु शकते.त्यामुळे कोणत्याही इतिहासाबद्दल बोलायचे असेल तर जाणीवपूर्वक व अभ्यास करूनच बोलले पाहिजे.देशात ज्याही काही ऐतिहासिक वास्तू आहेत त्याला सांभाळण्याचे दायित्व इतिहासकार व भारतीय पुरातत्व विभाग(ए.एस.आय.) यांच्याकडे आहे करीता यात कोणतीही राजकीय ढवळाढवळ किंवा वक्तव्येबाजी नको. येणाऱ्या पिढीला पुर्वी काय घडले याचाही इतिहास माहीत असायला हवा. आपण औरंगजेबाची कबर जर हटविली तर कोणाला माहीत होणार की तो क्रूर शासक होता किंवा मराठ्यांनी त्याला इथेच संपविले. नवीन पिढीला देशाचाच नाही तर संपूर्ण जगाचा इतिहास माहीत व्हायला पाहिजे.त्यामुळे कबर हटवुन इतिहासाशी छेडछाड करता येणार नाही.सध्या ब्रिटिशमध्ये संसदीय अधिवेशन सुरू आहे यावेळेस संसदेत जालियनवाला बाग हत्याकांडाचे पडसाद उमटतांना दिसले. ब्रिटिश संसदेत तेथीलच खासदार बॉब ब्लॅकमॅन यांनी जालियनवाला बाग हत्याकांडासाठी ब्रिटनने भारताची औपचारिक माफी मागावी अशी मागणी केली.या मागणीवरून ब्रिटनच्या संसदेत मोठा गदारोळ झाला.दिनांक १३ एप्रिल १९१९ मध्ये पंजाबमधील जालियनवाला बाग येथे हे भयावह हत्याकांड घडले होते.बॉब ब्लॅकमॅन यांनी या घटनेचा उल्लेख ब्रिटिशांच्या वसाहत काळाच्या इतिहासातील लाजिरवाणा काळा डाग असे संबोधित केले आहे.या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने या अमानवीय कृत्याची जबाबदारी स्वीकारून औपचारिक माफी मागण्याचे आव्हान ब्लॅकमॅन यांनी संसदेत केले याचे स्वागतच. परंतु आता भारत सरकार या हत्याकांडाबदल माफी मागण्यास ब्रिटिश सरकारवर दबाव टाकणार काय असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्या प्रमाणे औरंगजेब क्रुर होता त्याच्या पेक्षा जास्त इंग्रजही क्रुर होते ही बाब जालियनवाला बाग हत्याकांडावरून सर्वांना लक्षात येते. त्यामुळे सध्या देशात जातीधर्माचे जे काही राजकारण सुरू आहे ते फक्त राजकीय पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैर वापर करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.देशात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत बेरोजगारी,पाण्याची समस्या, कुपोषण, शैक्षणिक समस्या, महागाई, प्रदुषण, नैसर्गिक महाप्रलय,शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण समस्या आहेत.परंतु त्याबाबतीत लोकांची दिशाभूल (डायव्हरशन) करण्याच्या उद्देशाने राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक वक्तव्य देत असल्याचे दिसून येते.राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांनी महापुरुष, थोर महात्मे,महान योध्दा किंवा इतिहास यांचा पुर्ण अभ्यास करूनच वक्तव्य केले पाहिजे जेणेकरून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही किंवा चुकीचा संदेश जाणार नाही याची काळजी मुख्यत्वे करून राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे.कारण एका चुकीच्या वक्तव्याने किंवा प्रक्षोभक भाषणाने लोकांमध्ये व्दिधा निर्माण होते व याचे वाईट पडसाद उमटतांना दिसतात हे आपणा सर्वांनाच ग्यात आहे.याची जाण राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे.जगाच्या पाठीवरील भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्मांचे, जाती पंथाचे लोक एकोप्याने राहतात व विभिन्न संस्कृती या भुमित दिसून येते.त्यामुळे जगात भारताची ओळख सुद्धा आगळीवेगळी आहे.त्यामुळे जगातील अनेक लोक भारतात इतिहासाचा,संस्कृतीचा व विविधतेचा अभ्यास करण्यासाठी येतात.त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची विरगाथा जगाच्या कानाकोपऱ्यात गेली पाहिजे यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.मी महामहीम राष्ट्रपती,प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट व लोकसभा अध्यक्ष यांना विनंती करतो की राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक किंवा लोकांचे मन दुखावणारे वक्तव्य करीत असेल व समाजात जहर पसरविण्याचे काम करीत असेल अशांवर कठोर कारवाई करावी.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार), मो.नं.९९२१६९०७७९,**

# ज्ञानमयी विकसित भारतासाठी युवकांच महत्वपूर्ण योगदान - कुलगुरु डॉ. महाजन

**परभणी -** महाविद्यालयीन ज्ञान साधनेत पदवी धारण सोहळा हा आयुष्यातील महत्वाचा आनंददायी क्षण .पदवी नंतर लोकजीवनात सेवा समर्पणाच्या अनेकविध संधी लाभत असतात.आपल्या कौशल्याधिष्ठित ज्ञानाधारे समाजाच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी युवकांनी ज्ञानाचा सदुपयोग करावा. समस्यामुक्त समाधानी समाज निर्माणाचा ध्यास घेत ज्ञानसाधकांनी योगदान द्यावे असे आवाहन डॉ.अशोक महाजन प्र - कुलगुरू,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड २७- व्या दीक्षांत समारंभात मान्य झालेल्या पदव्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ.अशोक महाजन बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हेंमतराव जामकर अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था ,परभणी.प्रमुख उपस्थिती ड.किरणराव सुभेदार उपाध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था, परभणी. विजयराव जामकर सचिव, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था, परभणी.प्राचार्य डॉ वसंतराव भोसले या मान्यवरां सह उपप्राचार्य डॉ संगीता आवचार , परीक्षा विभाग प्रमुख डॉ.आशा गीरी , डॉ .रविंद्र इंगळे, डॉ.नसिम बेगम, डॉ अभिजित सरनाईक आदींची उपस्थिती लाभली. स्वामी रामानंद तीर्थ आणि कै.सौ.कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्र -कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांचा ड.किरणराव सुभेदार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.तर ड.किरणराव सुभेदार यांचे स्वागत प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांनी केले. विजयराव जामकर यांचे स्वागत उपप्राचार्य डॉ. संगीता आवचार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ वसंतराव भोसले यांनी केले. उपप्राचार्य डॉ संगीता आवचार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

आत्मनिर्भर भारता साठी सुनिता विलीयम सारखी उर्जा आणि संयम अंगिकारत स्वतःतील क्षमता सिद्ध करत आत्मबलानं विजयी व्हा , असे अभ्यासपूर्ण मत डॉ.अशोक महाजन यांनी मांडले.

प्र- कुलगुरू डॉ.अशोकराव महाजन आणि मान्यवरांचे हस्ते बीए ,बीकॉम, बीसीए ,बी.व्होक, एम.व्होक, एम कॉम ,एम.सी.ए,एम.ए.संगीत अशा एकूण ११९ विद्यार्थीनींना पदवी वितरीत करण्यात आली.

शिक्षणाच्या आधारे सेवा कार्य विकसित करत पदवीधरांनी लोकसेवेचे कार्य प्रभावीपणे राबविण्यासाठी सज्ज व्हावे असा आशावाद अध्यक्षीय समारोपात ॲड. किरणराव सुभेदार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.संगीता लोमटे यांनी तर आभार प्रा.डॉ. ओमप्रभा लोहकरे यांनी व्यक्त केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## जेईएस महाविद्यालयातील विधिनाट्य प्रशिक्षण शिबिरचा समारोप

# लोककला टिकली तरच लोकपरंपरा टिकेल! - राजकुमार तांगडे

**जालना । प्रतिनिधी -** लोककला टिकली तरच लोकपरंपरा टिकेल. म्हणून या कलेच्या संवर्धणासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिनेनाट्य अभिनेता राजकुमार तांगडे यांनी केले.

येथील जेईएस महाविद्यालयाच्या चुन्नीलाल गिरीलाल सभागृहात सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित विधी नाट्य शिबिराचा समारोप समारंभ प्रसंगी राजकुमार तांगडे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर, जालना महानगरपालिकेचे आयुक्त श्री. संतोष खांडेकर शिबीर संयोजक लोकशाहीर आप्पासाहेब उगले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री जालना होते.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलनाने करण्यात आली. दीपप्रज्वलनानंतर शिबिर संचालक लोकशाहीर आप्पासाहेब उगले यांनी शिबिराच्या उद्देशावर भाष्य केले व या शिबिराचे महत्त्व उलगडले.

या शिबिरात सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी विधी नाट्याचे विविध पैलू आत्मसात केले होते. त्याचे उत्कृष्ट सादरीकरण या समारोप सोहळ्यात करण्यात आले. सर्वप्रथम विधी नाट्यातील मुख्य वाद्ये - संबळ, दिंडी, डवर, तुंतूने, टाळ यांचे वादन करून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. यानंतर गोंधळ हा पारंपरिक लोककला प्रकार सादर करण्यात आला. हरीश, विश्वजीत आणि ज्ञानेश या विद्यार्थ्यांनी संहितेनुसार आवाहन, गण, तसेच गोंधळातील मुख्य पद सादर केले. यामध्ये विशेषतः 'नमिला गजवदन सखा' हा गण सादर करण्यात आला. त्यानंतर 'गोंधळाशी लवकरी ग आज यावे आंबे' हे पदही प्रभावीपणे सादर केले गेले. या सादरीकरणामुळे सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

यानंतर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील महत्त्वाचा विधी पूजा प्रकार, 'भराड', सादर करण्यात आला. भैरवनाथाचा अवतार म्हणून ओळखला जाणारा हा विधी सोहम, प्रणव, आदित्य व हरीश यांनी संहितेनुसार सादर केला. या सादरीकरणात 'माझे भैरवनाथ घोड्यावरी' हे पद अत्यंत भावनिक वातावरणात सादर करण्यात आले. तसेच जेजुरीच्या खंडेरायाचे जागरण पारंपरिक संहितेनुसार करण्यात आले. यात प्रमुख कलाकार म्हणून विश्वजीत, आनंद व स्वाती यांनी सहभाग घेतला. जागरणामध्ये विशेषतः 'गण नमिला मल्हारी खंडेराया भोळ्या देवा' आणि 'भंडाऱ्यांनी ओटी म इझी भरली' ही पदे सादर करण्यात आली, ज्यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

यानंतर प्रेक्षकांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरलेला 'वासुदेव' हा लोककला प्रकार सोहम व ओंकार यांनी उत्कृष्टपणे सादर केला. या सादरीकरणात 'ऐका संतवाणी' या कलाप्रकाराचा समावेश करण्यात आला, ज्यामुळे धार्मिक व सामाजिक संदेश देण्याचे उद्दिष्ट प्रभावीपणे पूर्ण झाले. या कार्यक्रमाच्या मध्यंतरामध्ये मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते शिबिरार्थ्यांना प्रमाणपत्रे व ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात या शिबिरात सादर झालेल्या लोककला प्रकारांचे आणि विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक केले.




लोककलेतील दुर्मिळ प्रकारांपैकी एक 'कडकलक्ष्मी' अर्थात 'लखा आईचा पोतराज' हा कलाप्रकार आनंद घुले यांनी पारंपरिक पद्धतीने सादर केला. या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाच्या शेवटी शिबिर संचालक आप्पासाहेब उगले यांनी आभार प्रदर्शन केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लोककला विभाग प्रमुख कल्याण उगले, रामकिसन उगले, तसेच शाहीर रामानंद उगले यांचे विशेष योगदान लाभले.

# मोफत जयपुर फूट शिबिर आयोजित

**जालना । प्रतिनिधी -** विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब जालना रेनबोतर्फे मुंबई येथील रत्ननिधी फाउंडेशनच्या सहकार्याने मोफत जयपुर फूट मोजमाप आणि वाटप शिबिराचे आयोजन केले आहे. सदरील शिबिर मंगळवार दि. ८ एप्रिल रोजी रोजी सॅफ्रॉन हॉटेल या ठिकाणी होणार आहे. या शिबिरामध्ये विशेष करून गुडघ्याच्या वर पाय गमावलेल्या गरजू रुग्णांची नवीन तंत्रज्ञानाने विकसित केलेल्या जयपूर फूटचे मोफत वितरणासाठी प्रारंभी मोजमाप घेऊन नंतर वाटप केले जाणार आहे. या शिबिरामुळे अनेक व्यक्ती स्वावलंबी होऊन स्वतः चालू शकतील, अशी भावना क्लबचे अध्यक्ष महेश माळी व सचिव रो. गौरव करवा यांनी व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. अतुल जिंतूरकर, डॉ कैलास दरगड व डॉ. रवी बेदरकर हे परिश्रम घेत आहेत. ८ एप्रिलपूर्वी महेश माळी (९४२२७२५२२), जयेश पहाडे (९८२३५०७३९९) यांच्याकडे नाव नोंदणी करून जास्तीत जास्त गरजूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प प्रमुख जयेश पहाडे आणि डॉ. प्रशांत पळनिटकर यांनी केले आहे.

पान १ वरुन

## लिंबे वडगांव ...

टक्केवारी मागितली होती परंतु झोपडीपट्टीतील नागरिकांनी टक्केवारी देण्यास नकार दिल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी द्वेषापोटी सदरील प्रकार केला आहे. ही नोटीस दि. ३१/०३/२०२५ रोजी आपल्या कार्यालयाकडून प्रसिद्ध केल्याचे दिसून येत आहे आणि सदर नोटीस मध्ये पंधरा दिवसाचे आत आक्षेप सादर करण्याचे सुचविले होते परंतु प्रत्यक्ष सदर नोटीस ग्रामपंचायत कार्यालय दाखविली नाही व तलाठी यांनी दिली नाही. त्यामुळे सदर अक्षय अर्ज मंजूर करून नमुना ८ प्रमाणे व प्रत्यक्ष जाय मोक्याप्रमाणे अर्जदाराचे क्षेत्र दुरुस्ती करून अर्जदारास न्याय देण्यात यावा. असे निदर्शनास आले आहे की आमच्या गावात जे नागरिक रहिवासी नाहीत त्यांचा आमच्या गावाचा काही संबंध नाही त्यांची नावे यादीत दिसून येत आहे त्यामुळे काही नागरिकांचे क्षेत्र कमी झाल्याचे दिसून येत आहे जे चुकीचे आहे त्यामुळे जे नावे लिंबे वडगाव येथील रहिवासी च्या व्यतिरिक्त आहेत त्यांची रहिवासी पुरावे घेऊन पुढील कारवाई करण्यात यावी नसता त्यांचे ही नावे कमी करण्यात यावी. आमच्या संपादित घरे जागा गोठा इतर बाबींचा पूर्ण सर्वे करून प्रत्यक्ष जाय मोक्यावर स्थळ पंचनामा जागा मोजून संपादन प्रक्रिया पूर्ण करावी त्यानंतरच अंतिम यादी तयार करण्यात यावी जोपर्यंत वरील प्रमाणे कारवाई होत नाही तोपर्यंत अंतिम यादी तयार करू नये नसता सर्व गावकऱ्यांच्या वतीने उपविभागीय कार्यालय परतुर येथे दि.०१/०४/२०२५ रोजी पासून अमर उपोषण सर्व कुटुंबासह करण्यात येत आहे. सह्या करणारे लिंबे वडगाव तालुका मंठा येथील नागरिक परलाद खरात. उद्धव खरात. रामेश्वर राव खरात .गोविंद श्रावणे .गजानन शेंद्रे .जगन खरात. दत्ता खरात .दिगंबर खरात .गजानन गोरे. प्रसाद राव गोरे .राजेभाऊ शेरे .माणिक शेंद्रे. देविदास खरात. सोपान खरात. व समस्त गावकरी

## १३ वर्षीय ...

उघडकीस आली होती. यावर जालना गुन्हा शाखेकडून तपास सुरु होता. संबंधित घटनेविषयी चौकशी सुरु असताना महिलेल्या शेताजवळ राहणाऱ्या मुलाची पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीतून या मुलानेच महिलेचा खून केल्याची कबूली दिली आहे. मोबाईलसाठी डोक्यात दगड घालून या मुलाने महिलेला संपवल्याच्या घटनेनंतर संपूर्ण मराठवाडा हादरला आहे.

## लाच घेतांना ...

म्हणून ठरलेल्या या रकमेतील १ लाख २० हजार रुपये शेतकऱ्याने त्यांना देऊ केले होते. तर, उर्वरीत १ लाख रुपये शिल्लक असल्याने लाचखोरांनी सततचा तगादा लावला होता. त्यामुळे, वैतागलेल्या शेतकऱ्याने या लाचखोरीची एसीबीकडे तक्रार केली. त्यानंतर, एसीबीच्या पथकाने सापळा रचून महसूल अधिकाऱ्यांना रंगेहाथ अटक केली.

दरम्यान, एसीबीच्या कारवाईत तहसीलदार अभय गायकवाड आणि कवडजई सांजाचे तलाठी सचिन पुकळे यांना अटक करण्यात आली असून त्यांविरोधात गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. एसीबीने तहसीलदाराला ताब्यात घेतले असून तलाठी पुकळे फरार आहे. याप्रकरणी, एसीबीकडून पुढील कारवाई सुरू आहे.







# घनसावंगीत सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे संघटन पर्व

## रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत तालुका अध्यक्ष निवडीसाठी बैठक

**घनसावंगी । प्रतिनिधी -** देशाचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या अध्यक्षतेखाली घनसावंगी विधानसभेत भाजपाच्या 'संघटन पर्व' अंतर्गत तीन मंडळात तालुका अध्यक्ष निवडीठी बैठक घेण्यात आली. हजारो भाजप कार्यकर्त्याच्या उपस्थितीत घनसावंगी येथे भाजपा नेते सतीश घाटगे निवासस्थानी ही बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीस जिल्हा निवडणूक अधिकारी भास्कर दानवे, भाजपा नेते सतीश घाटगे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, भाजपचे ज्येष्ठ नेते विलासबापू खरात, मावळते तालुका अध्यक्ष शिवाजीराव बोबडे, बाबुराव खरात, भाजपचे महामंत्री सिध्दीविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपने नुकतेच राज्यभरात सदस्य नोंदणी अभियान राबविले. या अभियानात सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली ३५ हजार नवीन सदस्य नोंदणी करण्यात आली. घनसावंगी विधानसभेत भाजपचे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सूचनेनुसार मतदारसंघात नवीन मंडळ रचना तयार करण्यात आली. या मंडळासाठी स्वतंत्र तीन तालुका अध्यक्षांची निवड करण्यसाठी घनसावंगीत १ एप्रिल रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत इच्छुक उमेदवाराकडून उमेदवारी अर्ज भरून घेण्यात आली लवकरच घनसावंगी मतदार संघातील तिन्ही मंडळाच्या तालुका अध्यक्षाची निवड जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सतीश घाटगे यांनी दिली. हजारो भाजप कार्यकर्त्याच्या उपस्थितीत घनसावंगी विधानसभेतील तीन मंडळाचे उमेदवारी अर्ज जिल्हा निवडणूक अधिकारी भास्कर दानवे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी रावसाहेब दानवे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दृष्टीने मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच भास्कर दानवे यांनीही पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले.

**जि.प. सदस्य जीवनराव वगरे यांचा भाजपात प्रवेश**

घनसावंगी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ चिंचोली जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य श्री. जीवनराव वगरे यांनी आपल्या समर्थकांसह मा. सतीश घाटगे साहेब यांच्या नेतृत्वाखाली भाजपात जाहीर प्रवेश केला. केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते त्यांनी पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचा रावसाहेब पाटील दानवे व सतीश घाटगे साहेबांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सदस्य नोंदणीस प्रारंभ; राष्ट्रवादी काँग्रेस स्वयंरोजगार विभागाचा उपक्रम



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंतर्गत रोजगार व स्वयंरोजगार विभागाद्वारे आज दिनांक १ एप्रिल रोजी जालना शहरातील स्टेशन रोडवरील कृष्णा आर्केड येथून या सदस्य नोंदणीस प्रारंभ करण्यात आला असुन या उपक्रमात लघु उद्योजकांनी सदस्य नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले. रोजगार आणि स्वयंरोजगार करणार्या कामगारांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळावा या उद्देशातुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदअण्णा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी स्वयंरोजगार विभागाच्या जालना जिल्हाध्यक्षा सौ.प्रतिमा मसवले यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या कृष्णा आर्केड या ठिकाणी आज लघुउद्योजकांच्या सदस्य नोंदणींचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष सौ.प्रतिमा मसवले व उपाध्यक्ष निवृत्ती डिघे यांनी या उपक्रमांत लघुउद्योजकांनी शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी यामध्ये सहभागी होऊन जास्तीत-जास्त नोंदणी करून घ्यावी असे आवाहन त्यांच्या वतीने करण्यात आले.

# सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया जालना दौऱ्यावर

## शेतकरी कामगार यांच्याशी साधणार संवाद

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक कार्यकर्त्या व भ्रष्टाचार विरोधी कणखरतेने लढणाऱ्या नेत्या अंजलीताई दमानिया या गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी जालना जिल्हा दौऱ्यावर येत असून त्या दुपारी तीन वाजता रामनगर सहकारी साखर कारखाना परिसरात उस उत्पादक शेतकरी, कामगार, मजूर यांच्याशी संवाद साधणार आहेत.

रामनगर सहकारी साखर कारखाना हा जालना-बदनापूर तालुक्यातील महत्त्वाचा आणि तेवढाच शेतकऱ्यांसाठी आर्थिक स्त्रोत होता. परंतु गेल्या काही वर्षांपासून राजकीय-भ्रष्टाचाऱ्यांच्या चिखलात अडकलेला या कारखान्याचा रथ काही केल्या बाहेर येईना. शेतकरी, कामगार यांचा रस्त्यापासून ते थेट दिल्लीपर्यंत लढा सुरूच आहे. या लढ्याला पाठबळ मिळावे यासाठी या भागातील उस उत्पादक शेतकरी, कामगार, मजूर तसेच जेष्ठ समाजसेवकांनी सौ. अंजली दमानिया यांची भेट घेतली आणि त्यांना जालना सहकारी साखर कारखाना, लालबाग जिनिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना महानगर पालिका तसेच जिल्ह्यातील वाढती गुन्हेंगारी या परिसरातील विविध समस्यांविषयी अवगत करून दिले. त्या अनुषंगाने दि. ३ एप्रिल रोजी त्या कारखाना परिसरातील शेतकरी, सभासद, ऊस उत्पादक, मजूर यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्या जालना येथे गुरुवारी मुक्कामी असून शुक्रवारी त्या संभाजीनगरकडे रवाना होतील अशी माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

# जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट; वारा, पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांच्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. १ ते २ एप्रिल २०२५ या कालावधीत ऑरेंज अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ५०-६० कि.मी.प्र.ता. वेगाने) व गारपीट होण्याची तर ३ एप्रिल रोजी यलो अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. ४ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी वादळी वारे, विजेपासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती दक्षता बाळगावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश महाडिक यांनी केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, विज चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहु नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व विज चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून दूर रहावे.



मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजाचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या, लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमिनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकच्या तहसील कार्यालयात, पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# राज्यपाल हरिभाऊ बागडे जालना दौऱ्यावर

**जालना । प्रतिनिधी -** राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे बुधवार दि.२ एप्रिल २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. २ एप्रिल २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ८.३० वाजता आन्वी ता.बदनापूर येथे आगमन व पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत श्री.भगवानबाबा आश्रम शाळेच्या वसतिगृह भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १० वाजता आन्वी येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

बुधवार दि. २ एप्रिल २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून शासकीय वाहनाने सकाळी ८.३० वाजता आन्वी ता.बदनापूर येथे आगमन व पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत श्री.भगवानबाबा आश्रम शाळेच्या वसतिगृह भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.१५ वाजता आन्वी येथून बीडकडे प्रयाण करतील.

